# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 16/05/2023 (मंगळवार) सायंकाळ

---

## विनयभंग

पो.स्टे. काटोल :– दिनांक १४/०५/२०२३ चे ०९.४५ वा. ते १०.०० वा. पर्यंत यातील **आरोपी नामे– निखील राजु नेहारे, वय २१ वर्ष रा. अन्नाभाउ साठेनगर काटोल** याने फिर्यादी/पिडीता वय १७ वर्ष ११ महिने हिचा पाठलाग करीत काटोल जवळ हात पकडुन फिर्यादीला लज्जा वाटेल असे कृत्य करून फिर्यादीचा विनयभंग करून हातबुक्कीने मारपीट करून शिवीगाळ केली तसेच मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३५४ (अ), ३५४ (ड), ३२३, ५०४, ५०६ भादवी सहकलम ८, १२ बालकाचे लैंगीक अपराधापासुन सरंक्षण २०१२ कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि. खोब्रागडे मॅडम पोलीस स्टेशन काटोल मो. नं. ८३०८०८२०९४ या करीत आहे.

## घरफोडी

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील नबिरा कॉलेज जवळ धंतोली काटोल येथे दिनांक १४/०५/२०२३ चे १७.०० वा. ते दिनांक १५/०५/२०२३ चे ०६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे–हेमंत प्रल्हादराव कुटे, वय ४२ वर्ष, रा. नबिरा कॉलेज जवळ धंतोली काटोल यांच्या घरातील लोखंडी कपाटात ठेवलेले जुनी वापरती सोन्याची चैन १२ ग्रॅम किंमती ३०,०००/– रूपयाची व जुनी वापरती सोन्याची अंगठी ६ ग्रॅम किंमती १५,०००/– रूपयाची तसेच दोन जुन्या वापरत्या चांदीच्या समया अंदाजे वजन १० तोळे किंमती ६०००/– रू. व नगदी १०,०००/– रूपये असा एकुण ६१,०००/– रूपयाचा मुद्‌देमाल कोणीतरी अज्ञात चोराने घराचे दाराचे कुलूप तोडुन आत प्रवेश करून चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि. दत्तात्रय कोलटे पोलीस स्टेशन काटोल मो. नं. ८८०५४४८४१७ हे करीत आहे.

## अवैधरीत्या धारदार व घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत वाहीटोला ता. रामटेक जि. नागपुर येथे दिनांक १५/०५/२०२३ चे १६.४८ वा. ते १८.३० वा. दरम्यान पोलीस स्टेशन रामटेक येथील स्टाफ यांना गुप्त बातमी दाराने माहीती दिली की यातील आरोपी नामे— राजकुमार गनेश कठौते, वय ४० वर्ष, रा. वाहीटोला ता. रामटेक हा आपल्या ताब्यात अवैध्यरित्या लोखंडी हत्यार वापरतो अशा माहीतीवरून सदर ईसमाच्या घरी जावुन पंचा समक्ष त्याची व त्याच्या घराची घरझडती घेतली असता त्याच्या घराच्या रूमच्या सज्जावर एक लोखंडी जुन्या बनावटीची गुप्ती किंमती अंदाजे २००/— रू ची मिळुन आल्याने सदर गुप्ती बाबत आरोपीने समाधान कारक उत्तरे न दिल्याने आरोपी विरूध्द सदर गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस नायक ब. नं. १८४० अमोल इंगोले पोस्टे रामटेक यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरूद्ध कलम ४, २५ शस्त्र कायदा १९५९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला सुचनापत्रावर रिहा करण्यात आले असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक प्रफुल रंधई हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**